महाराष्ट्र शासन
दू.क्र. २२६१७२८५, फॅक्स नं.०२२ २२६२२०८४
Email :- so१२.wsc-mh@nic.in

क्रमांक :टंचाई-२०१४/प्र.क्र.२०/पापु १४,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, जीरुग्णालय संकुल.टी.,
मुंबई.००१ ४०० -
दिनांक : १५ मार्च, २०१४

प्रति,

१. विभागीय आयुक्त ( सर्व )
२. जिल्हाधिकारी, ( सर्व )
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ( सर्व )
४. मुख्याधिकारी, नगर परिषद ( सर्व )

विषय :- पिण्याच्या पाण्याच्या टंचई निवारणार्थ खाजगी टँकरवर GPS यंत्रणा बसविताना घ्यावयाच्या प्रशासकीय दक्षतेबाबत व करण्यात येणा-या दंडात्मक कारवाईबाबत.

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्र. टंचाई २०१३ /प्र.क्र.४१८ /पापु-१४, दिनांक ०४.०१.२०१४

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीने सन **२०१२-१३** या कालावधीत टंचाई व दुष्काळ निवारणाबाबत शासनाने केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला होता. त्यात पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरच्या फेऱ्या नियोजीत वेळापत्रकाप्रमाणे निर्धारीत वेळेत होत नसल्याचे व टँकरच्या बनावट फेऱ्या दर्शवून त्यासाठी रकमेची आकारणी केली जात असल्याचे अंदाज समितीच्या निदर्शनास आले होते. असे गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणालीचा वापर करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे. त्यानुषंगाने शासनाने संदर्भाधीन परिपत्रकान्वये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरवर GPS यंत्रणा बसविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२. मात्र खाजगी टँकर वाहतूकधारका सोबत करण्यात येणाऱ्या करारात टँकर वाहतूकधारकानी टँकरवर GPS प्रणाली न बसविल्यास कोणता दंड आकारावा याबाबत कोणतीही सूचना सदर परिपत्रकात नसल्याने त्याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती काही जिल्हाधिकाऱ्यांनी केली होती. त्यानुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, खाजगी टँकरधारकासोबत करार करताना **"पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली बसविल्यानंतर GPS प्रणालीवर**

**ज्या टँकरच्या फेऱ्यांची नोंद होईल त्याच फेऱ्या देयकाकरीता अनुज्ञेय होतील व ज्या पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली नसेल आणि टँकरवाहतूक धारकांनी टँकरच्या फेऱ्या झाल्याचा दाव केल्यास अशा फेऱ्या बनावट ठरतील"** अशी स्पष्ट अट खाजगी टँकरवाहतूक धारकासोबत करावयाच्या करारपत्रामध्ये सदर अटीचा सामावेश करण्याबाबत सर्व प्रशासकीय यंत्रणांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

**( किरण गित्ते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, (सर्व)
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
४. तहसिलदार, तहसिल कार्यालय, (सर्व)
५. निवड नस्ती, पापु-१४

D:\WS १४\२०१४\OFFICE DOCUMENTS\CR २०.docx